स्थायी समिती

दाखल विषय – दि. १०/४/२०१८

**विषय क्रमांक :– ४८ त्वर्य**

मा.सौ.मंजुषा नागपुरे यांचे दि. १०/४/२०१८ चे पत्र.

पुणे म.न.पा. च्या मालकीचे सर्व जलतरण तलावाचे Safety Audit करण्यात यावे. Audit मध्ये जलतरण तलाव चालवत असलेले सर्व ठेकेदार नियमाप्रमाणे काम करत आहेत व सुरक्षा देत आहेत किंवा कसे याचा समावेश करण्यास तसेच सदर Audit Report ८ दिवसात मा.स्थायी समिती सभेत सादर करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– ४९ त्वर्य**

पुणे मनपाचे येरवडा भागातील राजीव गांधी हॉस्पिटलमध्ये कोठारी डायलसिस सेंटर व पुणे मनपाच्या संयुक्त विद्यमानाने अल्प दरात डायलेसिस सेंटर सुरु करण्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.योगेश मुळीक व मा.सौ.श्वेता खोसे–गलांडे यांचे दिनांक ७/१२/२०१७ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.१५९,दिनांक ३/१/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ / एच.ओ./१२३८, दि.२०.३.२०१८ ने पाठविलेला अभिप्रायाला अनुसरुन मा.महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. २२१ दि.२८/३/२०१८ विचारासाठी.

१.कोठारी चॅरीटेबल ट्रस्ट वडगाव शेरी १६३ शनिवार पेठ यांचे बरोबर राजीव गांधी रूग्णालय येरवडा येथे पुणे महानगरपालिके बरोबर संयुक्त विद्यमाने डायलेसिस प्रकल्प राबविणेस

२. कोठारी चॅरीटेबल ट्रस्ट वडगाव शेरी यांना डायलेसिस करीता प्रति रुग्ण र.रू ४००/– ( विना कन्झुमेबल ) इतका दर आकारण्यास परवानगी देणेस

३. कोठारी चॅरीटेबल ट्रस्ट वडगाव शेरी यांचेकडून सदरचा डायलेसिस प्रकल्प ५ वर्षे चालविण्याकरीता आवश्यक तो करारनामा करणेस व संयुक्त प्रकल्पात कोणताही प्रश्न उद्भवल्यास किंवा अडचण आल्यास त्या बाबतीत अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

**विषय क्रमांक :– ५० त्वर्य**

मा. महापालिका आयुक्त यांचे कार्यालयीन परिपत्रक जा.क्र. मआ/भां/८९/२०१७ दि.१५/११/२०१७ चे आदेशाअन्वये केंद्र शासनाच्या Government E-Market Place Portal (GeM) वरील उपलब्ध स्पर्धात्मक दरानुसार मा. नामदार. श्री. गिरीष बापट, मा. नामदार श्री.दिलीप कांबळे, मा.आमदार प्रा. सौ.मेधा कुलकर्णी यांच्या सन २०१७–१८ आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधीतून कचरा व्यवस्थापन व कचरा उचलणेकरीता ई रिक्षा (ई कार्ट वाहन) मे. कायनेटीक ग्रीन एनर्जी ॲण्ड पॉवर सोल्युशन लि., पुणे या उत्पादक कंपनीकडून Kinetic Safar Shakti with hydraulic system (Product Code as per GEM Portal :- 5116877-46232364956) या मॉडेलची १ नग ई रिक्षाकरीता (ई कार्ट वाहन) रक्कम रु.१,९८,३५१=०५ याप्रमाणे १३ नग ई रिक्षाकरीता (ई कार्ट वाहन) रक्कम रु.२५,७८,५६३=६५ पर्यंत जीएसटी करांसह (आरटीओ रजिस्ट्रेशन व नामफलकासह) त्यांचे दरपत्रकातील सर्व अटी व शर्ती स्विकारुन त्यांच्या बरोबर खरेदीपोटी करारनामा करणेस व त्यापोटी देय देयके मे.कायनेटीक ग्रीन एनर्जी ॲण्ड पॉवर सोल्युशन लि., पुणे यांचे नावे ऑनलाईन पध्दतीने आरटीजीएस/एनईएफटी याद्वारे आदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मोवावि/५ दि.५/४/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ५१ त्वर्य**

पुणे पेठ कोरेगाव पार्क सि.स.नं. ११/१/क प्लॉट नं. ५ येथील ओरीयन बिल्डींग मधील ऑफिस नं. १०१ ही जागा महाराष्ट्र मेट्रो रेल कॉ.लि. यांना दरमहा भाडे र.रुपये १,२५,०१३/– तसेच इतर शासकीय कर आणि अनामत रक्कम आकारुन पूर्वीची मुदत संपलेल्या दिनांकापासून पुढील ३ वर्षाच्या कालावधीकरिता म्हणजे दि.१/१२/२०१७ ते दि.३०/११/२०२० अखेरपर्यंत भाडेपट्टा कराराने उपलब्ध करुन देणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/७ दि.५/४/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ५२ त्वर्य**

प्रभाग क्र. ३९ क मध्ये स.नं. ३५ मधील जागेवर प्ले ग्राऊंड विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.भोसले कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५९,९४,१९२=७५ पेक्षा ७.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५५,७४,५९९=२५ चे रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटी शर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/०८ दि.१०/४/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ५३ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या मिळकतकर विभागाची राष्ट्रीय लोक अदालत घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/०९ दि.१०/४/२०१८ चे पत्र.

१. ज्या मिळकतीस यापूर्वी तीनपट करआकारणी करण्यात आली आहे त्यांची महाराष्ट्र मनपा सुधारणा अध्यादेश, २०१७ चा अध्यादेश क्रं.३ दिनांक ८/१/२०१७. अन्वये शासन निर्णय क्रं.२०१५/प्रक्रं ३०५/नवि २० मंत्रालय मुंबई ४०० ०३२.दिनांक ११/१/२०१७ अन्वये मान्यता विचारात घेवून मा. स्थायी समिती ठराव क्रं ५६ दिनांक १८/०४/२०१७ व मा.मुख्य सभा ठराव क्रं. ८० दिनांक २७/०६/२०१७ अन्वये निवासी अवैद्य बांधकाम असलेल्या मिळकतीचे चटई क्षेत्र ६०० चौ फुट असल्याने पुर्वी केलेली तीनपट कर आकारणी दि. ०१/०७/२०१७ पासुन एकपट करणेबाबत,६०१ ते१००० चौ. फुट असल्याने पुर्वी केलेली तीनपट कर आकारणी दि. ०१/०७/२०१७ पासुन दीडपट करणेबाबत मिळालेल्या मान्यतेस अनुसरून केवळ निवासी अवैद्य बांधकाम असलेल्या मिळकतीचे चटई क्षेत्र ६०० चौ फुट असल्याने पुर्वी केलेली तीनपट कर आकारणी दि. ०१/०७/२०१७ पासुन एकपट करणेबाबतच्या केसेस दिनांक २२/४/२०१८ रोजी होणाऱ्या 'राष्ट्रीय लोक अदालत' मध्ये घेणेबाबत व अशा सर्व मिळकतदारांना (मोबाईल टॉवर्स व्यतिरिक्त) लेखी नोटीस सहा. अधिक्षक दिवाणी व फौजदारी मनपा न्यायालय, पुणे यांचे स्वाक्षरीसह तयार करून ती मे एसएसके इन्फोटेक प्रा.ली (सन २०१८=२०१९ या वर्षातील मिळकतकर बिल छपाईचे निविदाधारक) यांचे मार्फत छपाई करून ते इंडीयन पोस्टामार्फत मिळकतदारांना पाठविणेस.
२. याबाबतची माहिती प्रसिध्द होण्यासाठी सर्व स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रेसनोट प्रसिध्द करणेस व दैनिक सकाळ व महाराष्ट्र टॉईम्समध्ये जाहीर प्रकटन एक वेळ प्रसिध्द करणेस.
३. प्रस्तुत बाबत येणारा संपूर्ण खर्च सन २०१८=२०१९ चे अंदाजपत्रकातील छ. करआकारणी व करसंकलन कार्यालय, ३ संकीर्ण आरई११जी १०३ या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**